


राधेय
रणजीत
देसाई

# रणजित देसाई

**जयंती : ८ एप्रिल, १९२८**
**स्मृतिदिन : ६ मार्च, १९९२**



उमद्या, दिलदार मनाचा एक थोर साहित्यिक. रणजित देसाईंचे साहित्य म्हणजे वाचकांशी उच्च भावनिक स्तरावर साधलेला कलात्मक संवाद. महाराष्ट्रातील या थोर, सर्जनशील, प्रतिभावान साहित्यिकाचा जन्म कोल्हापुरातील कोवाड येथील एका संपन्न खानदानी कुटुंबात झाला. शिक्षणानंतर कोवाडला स्थायिक झाल्यावर तिथल्या निसर्गरम्य वातावरणात त्यांनी लेखन-वाचन हा छंद जोपासला. १९४६ मध्ये 'प्रसाद' या मासिकात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'भैरव' या पहिल्याच कथेला पारितोषिक मिळाले. १९५८ साली त्यांचा 'रूपमहाल' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्याच सुमारास 'बारी' ही कादंबरी लिहून त्यांनी कादंबरीक्षेत्रात पहिले पाऊल टाकले. त्यांनी ऐतिहासिक, सामाजिक, पौराणिक या विषयांबरोबरच चरितकहाणी हा कादंबरीचा नवा प्रकार हाताळला आणि आपल्या समर्थ लेखणीने तो लोकप्रियही केला. चरित्रकादंबरीसाठी त्यांनी निवडलेल्या व्यक्ती सर्वसामान्य वर्गात न बसणाऱ्या, असामान्य कर्तृत्व असलेल्या आहेत. 'स्वामी' या त्यांच्या कादंबरीला अफाट लोकप्रियता मिळाली. या कादंबरीत त्यांनी थोरले माधवराव पेशवे व त्यांच्या पत्नी रमाबाई यांच्यातील कोमल भावबंध लोकांसमोर मांडला. या कादंबरीवर लोकांनी जिवापाड प्रेम केलेच, त्याचबरोबर रणजित देसाई यांना 'स्वामीकार' हा किताबही बहाल केला. कथालेखन करताना देसाई यांनी प्रथमच जाणीवपूर्वक प्राणिकथा लिहिल्या. या कथांमधून निसर्ग, माणूस आणि प्राणी यांचा अतूट संबंध त्यांनी फारच प्रभावीपणे मांडला.

'स्वामी' या एकाच कादंबरीला राज्य पुरस्कार, ह.ना. आपटे पुरस्कार आणि साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले. रणजित देसाई यांनी अनेक प्रादेशिक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले. साहित्यक्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल केंद्र शासनाने

त्यांना 'पद्मश्री' हा किताब बहाल करून सन्मानित केले.

# रणजित देसाई यांची साहित्यसंपदा

**कादंबरी**

* स्वामी * श्रीमानयोगी * अभोगी * राधेय * पावनखिंड * माझा गाव * समिधा * बारी * राजा रविवर्मा * प्रतिक्षा * शेकरा * लक्षयवेध

**कथासंग्रह**

* रुपमहाल * मधुमती * कमोदिनी * आलेख * गंधाली * मोरपंखी सावल्या * कातळ * मेघ * आषाढ * वैशाख * प्रपात * संकेत * बाबुलमोरा * मेख मोगरी

**नाटके / एकांकिका**

* स्वामी * वारसा * हे बंध रेशमाचे * रामशास्त्री * धन अपुरे * गरुडझेप * श्रीमानयोगी * लोकनायक * संगीत तानसेन * कांचनमृग * पंख जाहले वैरी * पांगुळगाडा * तुझी वाट वेगळी * सावली उन्हाची

**ललित**


*स्नेहधारा * संचित

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, without the prior written consent of the Publisher and the licence holder. Please contact us at **Mehta Publishing House** , 1941, Madiwale Colony, Sadashiw, Peth, Pune 41 1030. (phon) +91 020-24476924 / 24460313

Email: info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com

Website: www.mehtapublishinghouse.com

◆ या पुस्तकातील लेखकाची मते, घटना वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहत असतीलच असे नाही.




# राधेय

रणजित देसाई

मेहता पब्लिशिंग हाऊस

**RADHIEYA** by RANJEET DESAI

**राधेय : रणजित देसाई / कादंबरी**

© सौ. मधुमती शिंदे व सौ. पारु नाईक

प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१
सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे - ४११०३०.

प्रकाशनकाल : १९७३ / १९७६ / १९७६ / १९८२ / १९८६ / १९९० / १९९५ /
१९९७ / १९९९ / २००० / २००२ / २००४ / २००५ / २००६ / २००७ /
मार्च, २००८ / नोव्हेंबर, २००८/ फेब्रुवारी, २०१० / सप्टेंबर, २०१० /
ऑगस्ट, २०११/ एप्रिल, २०१२ / फेब्रुवारी, २०१३ / मार्च, २०१४ /
जुलै, २०१५ / पुनर्मुद्रण : सप्टेंबर, २०१६

P BOOk. ISBN 978817766 7462

E BOOk. ISBN 9788184988055

E Books available on : play.google.com/store/books
m.dailyhunt.in/Ebooks/Marathi

# आठवण

'स्वामी' नंतर मी 'राधेय'चा संकल्प सोडला; पण त्या आधी 'श्रीमान योगी' पुरे झाले. या दहा वर्षांत कर्ण तसाच मनात राहिला.

आज 'राधेय' पुरे होत आहे. 'राधेय' लिहीत असता ज्या ग्रंथांनी सोबत केली, ज्या मित्रांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांचीच आज आठवण होत आहे.

'राधेय'च्या निमित्ताने कै. बाळशास्त्री हरदास, कै. इरावतीबाई कर्वे यांच्या बरोबर चर्चा करण्याचे भाग्य लाभले. माझे मित्र प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या संगतीत 'राधेय' साकारला. प्रा. पां. ना. कुलकर्णी, श्रीमती शान्ताबाई शेळके, प्रा. रा. शं. वाळिंबे यांनी 'राधेय' निर्दोष व्हावा, म्हणून अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या. हा स्नेह मला मोलाचा वाटतो.

माझे गुरु ती. श्री. वि.स.खांडेकर यांचे आशीर्वाद व मार्गदर्शन मला सदैव लाभले.

माझ्या मित्रांनी मला अखंड साथ दिली. श्री. राजाभाऊ मराठे, श्री.डी.जी.देशपांडे, श्री. शंकरराव कुलकर्णी, श्री. दौलत मुतकेकर यांच्यासारख्या मित्रांनी मला 'राधेया'त गुंतवून ठेवले. श्री. एम्. एन्. शिंदे यांचा वडीलकीचा धाक सदैव जाणवत राहिला. कु. शैलजा गवळे यांनी टिपणे काढण्यात मदत केली. श्री. पांडुरंग कुंभार यांनी न कंटाळता 'राधेय'ची नक्कल तयार केली. या सर्वांचे पाठबळ नसते, तर ही कलाकृती पुरी झाली नसती.

'राधेय'साठी अनेक दुर्मीळ ग्रंथ, महाभारताच्या प्रती मला माझ्या मित्रांनी उपलब्ध करून दिल्या. श्री. बाळासाहेब काळे (जमखंडी), श्री. सुरेश पांडुरंग गिंडे (बेळगाव) यांचा त्यातला वाटा मोठा आहे.

कै. नाना हेरवाडकर व कै. शाहीर गव्हाणकर या दोन मित्रांची आठवण आज होत आहे. ते आज असायला हवे होते.

वाचकांचा प्रेमभाव पंचवीस वर्षे लाभला आहे. ते प्रेम व अगत्य अखंड राहो, हीच एक नम्र विनंती.

'राधेय' आपल्या हाती देत असता श्रीज्ञानेश्वरांच्या वचनाची आठवण होते.

**तऱ्ही न्यून तें पुरतें | अधिक ही सरतें**
**करूनि घेयावें हें तुमतें | विनविलें मियां**

**रणजित देसाई**

बाईंना कर्ण मुळीच आवडायचा नाही. त्यांना अर्जुन आवडे. मी कर्णाबद्दल बोलू लागलो की, त्या म्हणत, 'मी तुझा कर्ण मुळीच वाचणार नाही.'
आज बाई असत्या, तर माझ्या प्रेमापोटी त्यांनी कर्ण वाचला असता. कुणास माहीत, कौतुकही केलं असतं!
आज बाई नाहीत, म्हणून काय झालं? ही कर्णकहाणी त्यांनाच अर्पण.

**सौ. इरावतीबाई कर्वे**
यांना सादर सप्रेम अर्पण.

ही कादंबरी हिंदी व गुजराथी भाषेतही भाषांतरित झाली आहे.